सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र. १६३(२)/२०१९/१४-ब/१९** **दिनांक- १७ डिसेंबर, २०२१**

## -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ अंतिम निकाल.**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०४/२०१९ व अधिसूचना क्रमांक १२/२०१९.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महसुल व वन विभागातील सहायक वन संरक्षक, गट-अ तसेच वनक्षेत्रपाल, गट-ब या संवर्गातील एकूण १०० पदांवरील भरतीकरिता दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ चा अंतिम निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १७ डिसेंबर ,२०२१ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे.

**२.** सदर परीक्षेत अहमदनगर या जिल्ह्यातील श्री. दिघे वैभव सुरेश (बैठक क्रमांक- MB००१३०६) हे राज्यातून तसेच मागासवर्गीयातून प्रथम आले असून पुणे या जिल्ह्यातील श्रीमती पानसरे पुजा भाऊसाहेब (बैठक क्रमांक- MB००५१३८) ह्या महिला प्रवर्गातून प्रथम आल्या आहेत.

**३.** प्रस्तुत पदांची गुणवत्ता यादी, शिफारस यादी गुणांची वर्गवारीनिहाय सीमारेषा प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची पदासाठीची पात्रता तसेच प्रमाणपत्रांची सत्यासत्यता/वैधता विहीत निगडीत प्राधिकरणांकडून तपासण्याच्या अटीवर सदर पदांवर शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे. वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गाच्या अनुसूचित जमाती महिला वर्गवारीतील एका पदाचा निकाल मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राखून ठेवण्यात आला आहे.

**४.** प्रस्तुत निकाल विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**५.** प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे विहित पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**